जा. क्र. माध्य. ३/प्रथम मान्यता/पुणे 93८८२
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे :- १ यांचे कार्यालय.
दिनांक :- 12 NOV 1998

प्रति,
शिक्षणाधिकारी [माध्यमिक],
जिल्हा परिषद, पुणे

विषय :- प्रथम मान्यता.
सानेगुरुजी माध्यमिक विद्यालय, माळवाडी, हडपसर पुणे २८

संदर्भ :- आपले पत्र क्र. शिक्षण/माध्य/ह-७/प्र. मा/९७. ९८
दिनांक १८. ९. ९८

वरील संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३. १, ३. २, ३. ३ अन्वये महाराष्ट्र आरोग्य मंडळ हडपसर संस्थेच्या साने गुरुजी माध्यमिक विद्यालय, माळवाडी हडपसर पुणे २८ माध्यमिक शाळेच्या इयत्ता ८वी /~~९वी/१०वी~~ च्या वर्गास सन १९९७ - १९९८ या शैक्षणिक वर्षासाठी जून १९९७ पासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटींच्या पूर्ततेस अधीन राहून देण्यात येत आहे. शिक्षणाधिकारी [माध्यमिक] यांनी खालील अटींची पूर्तता शाळा करीत आहे किंवा कसे याची तपासणी करून पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटी पूर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याबाबतही अहवाल प्रस्तावासोबत पाठविण्यात यावा.

१] संस्थेने स्वत:च्या मालकीची शैक्षणिकदृष्ट्या योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करून द्यावी.
२] मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करावी.
३] स्वतंत्र व विषयावार प्रयोगशाळा सर्व साहित्यानीशी उपलब्ध करून द्यावी.
४] स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करून दरवर्षी अधिक ग्रंथाची भर घालावी.
५] विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून द्यावे.
६] पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करून द्यावा.
७] स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करून द्यावी.
८] वाढीव फी चे दर मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून मंजूर करून घ्यावेत.
९] शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून त्यात अद्ययावत नोंदी घेण्यात याव्यात.
१०] कर्मचा-यांना सरकारी वेतनश्रेणीनुसार वेतन अदा करावे.
११] शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.
१२] विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करावी.
१३]
१४]
१५]

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत :- मुख्याध्यापक, सोने गुरुजीमाध्यमिक विद्यालय, माळवाडी, हडपसर पुणे २८

जावक क्रमांक 9030
तारीख 9८/99.९८